# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 21 August 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २१ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसाच्या पोलंड आणि युक्रेनच्या दौऱ्यावर आज रवाना झाले. पोलंड आणि भारतादरम्यानच्या राजनैतिक संबंधांना सत्तर वर्षं पूर्ण होण्याच्या वर्षी ही भेट होत असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क आणि राष्ट्रपती आंद्रेज डूडा यांची भेट घेऊन ते चर्चा करणार आहेत. तसंच पंतप्रधान मोदी पोलंड मधल्या भारतीयांशी, व्यापारी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. त्यानंतर युक्रेनचे राष्ट्रपती व्लादिमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी २३ तारखेला युक्रेनला जाणार असून, कोणत्याही भारतीय पंतप्रधानांनी युक्रेनला भेट देण्याची ही पहिलीच वेळ असेल.

****

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान आज बीड दौऱ्यावर येत आहेत. परळी इथल्या पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं उद्‍्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

ठाणे जिल्ह्यात बदलापूर प्रकरणी आरोपींवर कठोर कारवाईचा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. ते आज मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. बदलापूर रेल्वे स्थानकावर काल झालेलं आंदोलन हे राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचा आरोपही मुख्यमंत्र्यांनी केला.

दरम्यान, हे आंदोलन करणाऱ्या ३०० जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सरकारी कामात अडथळा आणणं, दगडफेक, कायदा आणि सुव्यवस्था बाधित करणं अशा आरोपांखाली हे गुन्हे दाखल केल्याचं पोलिसांनी सांगितलं. याप्रकरणी २८ जणांना आज न्यायालयासमोर हजर केलं असता, न्यायालयानं त्यापैकी २२ जणांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

****

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आज बदलापूरला जाऊन पीडित बालिकांच्या पालकांचं म्हणणं जाणून घेणार आहेत. बदलापूर इथं झालेली घटना अत्यंत दुर्दैवी असून, ही घटना ज्या शाळेत घडली, त्या शाळेची आणि संबंधितांची चौकशी शिक्षण विभागाचे उपसंचालक आणि बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष करत असल्याचं केसरकर यांनी सांगितलं. चौकशीचा प्राथमिक अहवाल आल्यानंतर या घटनेमधल्या दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल, असंही केसरकर यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना नमूद केलं.

****

राज्याच्या सर्वपक्षीय आमदारांच्या समितीनं तयार केलेल्या शक्ती कायद्याला अजूनही केंद्र सरकारनं मंजुरी दिलेली नाही, राज्यातल्या भाजप नेत्यांनी केंद्राकडून हा कायदा मंजूर करून आणावा, असं आवाहन माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केलं आहे. ते आज मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. हा कायदा मंजूर केला असता तर आज बदलापूर प्रकरणात या कायद्याची अंमलबजावणी करता आली असती, असं मत देशमुख यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आपल्या विदर्भ दौऱ्यासाठी आज गोंदिया इथं पोहचले आहेत. आज दुपारी ते गोंदिया इथं कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभाच्या रकमेतून बँकांनी कोणत्याही कर्जाचं समायोजन करू नये, अशी सूचना लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केली आहे. यासंदर्भातल्या बैठकीत त्या काल बोलत होत्या. काही लाभार्थ्यांकडे प्रलंबित असलेल्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे बँक खातं गोठवण्यात आलं असल्यास, ते तात्काळ सुरु करण्यात यावं, या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्राप्त होणारी रक्कम तत्काळ उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकार्यांनी दिले आहेत.

****

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून नांदेडमध्ये आतापर्यंत एक हजार २४ जणांची निवड झाली आहे. त्यापैकी १३४ उमेदवार प्रत्यक्ष रुजू झाले आहेत. या योजनेअंतर्गत इयत्ता बारावी पास प्रशिक्षणार्थींना सहा हजार रुपये, आयटीआय,

पदविकाधारक प्रशिक्षणार्थींना आठ हजार रुपये आणि पदवीधर, पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना दहा हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे.

****

नाशिक इथल्या अभिनव भारत संस्थेच्या स्मारकाचं नूतनीकरण करून संवर्धन करण्याच्या कामासाठी राज्य शासनाने सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र सध्या या वाड्यात राहणाऱ्या भाडेकरूंनी या संदर्भात न्यायालयात दाद मागितली होती. आणि या कामाला मनाई आदेश द्यावे अशी मागणी केली होती. नाशिकचे जिल्हा न्यायाधीश डॉ. यु जे मोरे यांनी मनाई आदेश देण्यास नकार दिल्यानं आता या स्मारकाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

****

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतला कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसाळे याचं कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीनं आज दिमाखदार स्वागत करण्यात आलं. यासाठी आयोजित केलेल्या स्वागत मिरवणुकीत नागरिक, शालेय विद्यार्थी आणि खेळाडू मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

****

जॉर्डनच्या अम्मान इथे सुरू असलेल्या सतरा वर्षाखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या रौनक दहियानं एकशे दहा किलो वजनगटात कांस्य पदक जिंकलं आहे. या गटाच्या जागतिक क्रमवारीत सध्या दुसऱ्या स्थानावर असलेल्या रौनकनं तुर्कियेच्या एमुरुल्लाह कॅप्कनला ६-१ नं हरवत कांस्यपदक पटकावलं आहे.

****